# औरंगाबाद येथील अत्याचार विरोधी परिषद

गेल्या दोनतीन वर्षांपासून ठिकठिकाणी परिषदा, बलात्कार विरोधी मंचाची स्थापना इ. कार्यक्रम होत आहेत. पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून स्त्रियांच्या प्रश्नावर एकत्रितपणे कार्यक्रम करण्याची गरज स्त्रीकार्यकर्त्यांना वाटत असावी याचेच ते द्योतक आहे. सर्वपक्षीय व सर्वसमावेशक स्वरूप असल्याने सामाजिक प्रश्नांमध्ये अधिक रस असलेल्या महिलाही यात पुढाकार घेताना दिसतात. याचेच प्रत्यंतर औरंगाबादला १० व ११ जानेवारी रोजी झालेल्या स्त्री अत्याचार विरोधी परिषदेमध्ये आले.

परिषदेला दोन्ही दिवस तीनशे ते चारशे स्त्रिया उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी करुणाताई चौधरी होत्या. मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रिया मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अनुभव कथनात मात्र ग्रामीण कष्टकरी स्त्रिया अनुभव हिरीरीने मांडताना दिसल्या.

परिषद दोन्ही दिवस पुरुषांनाही खुली होती. पहिल्या सत्राला श्रीमती ईस्मत चुगताई प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रसिद्ध लेखिका तसेच बंडखोर म्हणून प्रसिद्ध असल्याने त्यांच्या भाषणाबद्दल उत्सुकता होती. त्यांनी हुंडाविरोधी तसेच आर्थिक स्वातंत्र्याच्या आवश्यकतेसंबंधी विचार मांडले. संपूर्ण व्यवस्था बदलायला हवी असे त्या म्हणाल्या. परंतु ती कशी बदलणार ? त्या संबंधी आपण काय करायला हवे, याबाबत त्या विशेष बोलल्या नाहीत. त्या सत्राचे प्रास्ताविक ज्योत्स्नाताई धारपुरे यांनी केले होते. घरात बसून प्रश्न सुटणार नाहीत असे त्या म्हणाल्या.

दुसऱ्या सत्रात बलत्कारासंबंधी कायदेशीर सल्ला इ. बाबत चर्चा करण्यासाठी डी. आय. जी. श्री. मिसर, जज्ज श्री. गोगटे व ॲ. कुलकर्णी असे तिघेजण प्रमुख पाहुणे होते. श्री. गोगटे यांनी कायद्यातील उणिवांचा विचार करुन बदल करावा परंतु तेवढेच पुरेसे नाही, समाज जागृतीही आवश्यक आहे असे सांगितले. स्त्रीसतीचे मंदिर बनविणारा समाजही तितकाच दोषी आहे असे ते म्हणाले. डी. आय. जी. श्री. मिसर म्हणाले, कायदा सैल असला की फायदा आरोपीला मिळतो. नव्या कायद्याप्रमाणे स्त्रीने स्वखुशीने संमती दिली होती एवढे सिद्ध करण्याची जबाबदारी पुरुषाची आहे. परंतु कायदा जबानीतलाक मानत नाही. त्यामुळे ते सिद्ध करण्यासाठी पुरावा शोधण्याची जबाबदारी पोलिसांवर येते. तपास शुरु झाले की केस पुढे सरकण्यास थोडा विलंब होतो आणि या विलंबाचा फायदा आरोपी घेतात. त्यांच्यानंतर ॲ. कुलकर्णी बोलले. कायदे एकशे वीस वर्षांपूर्वी केलेले असल्याने त्यात बदल करणे योग्यच आहे. बलत्कार टाळण्यासाठी स्त्रीने खून केला तरी हरकत नाही असे ते सुरुवातीला बोलले. यानंतर मात्र भाषणाची गाडी भलत्याच दिशेला गेली व त्यामुळे सभागृहात वातावरण खूप तापले. 'आता तुम्ही आमच्याकडे (पुरुषांकडे) स्वातंत्र्य का मागता? मनूने स्त्रीच्या रक्षणासाठी केलेली व्यवस्था काय वाईट होती? स्त्रिया ब्यूटी पार्लर्समध्ये जातात म्हणून बलत्कार होतात.' इ. वाक्यांमुळे श्रोते अस्वस्थ होते.

दुसऱ्या दिवशी गटचर्चेच्या अगोदर श्रीमती शैला लोहिया, आंबेजोगाई यांनी प्रास्ताविक भाषण केले, आर्थिक, कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक गळचेपीचे त्यांनी चांगले वर्णन केले. याच चार प्रश्नांबाबत गट तयार करण्यात आले. गटचर्चांमध्ये स्त्रिया मोकळेपणे बोलत होत्या. परंतु या चर्चांचे अहवाल मात्र नीट समोर आले नाहीत. महत्वाचे मुद्दे राहून गेले. शिवाय एकूण चर्चेचा आशय काय होता या स्वरूपात इतर गटांना कळायला हवे होते परंतु तसे झाले नाही. कौटुंबिक गटात पुरुषांचा घरकामातील अपुरा सहभाग, लैंगिक शिक्षणाची आवश्यकता, धार्मिक रुढीमुळे होणारी गळचेपी यांची चर्चा झाली. थोडीशी कार्यक्रमावर चर्चा झाली परंतु तिचा धागा पुढे वाढविलेला दिसला नाही. धार्मिक गटात रुढी आणि अंधश्रद्धांचे दुष्परिणाम तसेच एकूणच धर्माचा प्रभाव हा व्यवस्थेचा आणि एकेका व्यक्तीला जो हताशपणा वाटतो त्याचा भाग आहे यावर चर्चा करण्यात आली.

सामाजिक गटात प्रचारमाध्यमातून स्त्रीचे केले जाणारे विकृतीकरण हा मुख्यतः नापसंतीचा विषय

दिसला. आर्थिक विभागामध्येही चांगली चर्चा झाली. स्त्रियांसाठी राखीव जागांची मागणी करण्यात आली.

या गटचर्चेचा अहवाल श्रीमती रसाळ, तसलीम पटेल, अनघा पाटील आणि शोभा शिराढोणकर यांनी वाचला.

अनुभव कथनात लातूरच्या औसगेकर यांचा मुंबईला नोकरीच्या शोधात गेल्यावर फसवणुकीच्या प्रयत्नांचा अनुभव सगळ्यांना धक्कादायक वाटला. औरंगाबादच्या दिपा शिरसाट यांनीतर या परिषदांनी काय होणार असा सवाल केला. सुनिता आरळीकर, लातूर व उषा ठोमरे, बीड यांनीही अनुभव सांगितले. पुण्याच्या मोलकरीण संघटनेच्या पद्माताई सुतार यांनी मोलकरिणी संघटनेच्या मागण्या समोर मांडल्या. रजिया पटेल पुणे हिनेही घरातल्या दडपशाहीविरुद्ध दिलेला लढा सांगितला.

पुढच्या ठराव वाचनाच्या कार्यक्रमात अनेक ठरावांवर चर्चा झाली. मुख्यतः समान वेतन कायदा, हुंडाविरोधी कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा यांची अंमलबजावणी करण्यात यावी; शालेय शिक्षणातील स्त्रीला दुय्यम स्थान दाखविणारे धडे काढून टाकावेत, लैंगिक शिक्षणाचा अंतर्भाव करावा तसेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तांत्रिक प्रशाला व वसतिगृह यांची सोय करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. कामाजवळ पाळणाघराची सोय, घरापासून मैलाच्या आत काम काढण्यात यावे तलाक, द्विभार्या या धार्मिक प्रथांविरुद्धही निषेध नोंदविण्यात आला.

स्त्रीमुक्तीचे वारे आता सर्वत्र पसरू लागल्याचे हे चिन्ह ! अशा सामायिक कार्यक्रमांसमोर उभे असलेले अनेक प्रश्न सगळीकडे समायन्न आहेत.

कार्यक्रमही सामायिक, एकत्रित घ्यायचे का? असले तर सगळ्यांनी समंजसपणा दाखविला नाही तर सर्वत्र आघाड्यांमधे होणारी दुही, फाटाफूट होणार का ? त्यांनी दूरवरचे परिणाम काय होतील? आज प्राथमिक अवस्थेत असलेली ही चळवळ ते पेलू शकेल ?

असे अनेक तिखट आणि नकोसे वाटणारे प्रश्न निर्माण होत आहेत. त्याचा विचार सगळ्यांनीच करायला हवा आहे. असे असले तरी मराठवाड्यात दूर-दूरच्या स्त्रियांना एकत्र करून अशी स्त्रियांच्या प्रश्नांवर परिषद घेण्यासाठी झटणाऱ्या सर्व स्त्री पुरुष कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करायलाच हवे. प्रयत्न होतात म्हणूनच पुढले प्रश्न निर्माण होतात. त्यांना उत्तरेही आपल्याला सापडतील अशी आशा !

**–डॉ. नीलम गोऱ्हे**

## सावित्रीबाई फुल्यांची १५० वी जयंति पुण्यात उत्साहाने साजरी

३ जानेवारी १९८१ रोजी सावित्रीबाई फुल्यांच्या जन्माला १५० वर्षे पूर्ण झाली. शिक्षण हे आत्मोन्नतीचे व सामाजिक प्रबोधनाचे साधन आहे हे लक्षात घेऊन समाजाचा विरोध पत्करूनही महात्मा फुल्यांनी १८५२ साली पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. त्यात सावित्रीबाई फुल्यांनी शिक्षिकेचे काम पत्करून स्वतःला स्त्रीशिक्षणाला वाहून घेतले. आणि स्त्रीमुक्तीचा पाया घालण्यास मदत केली. आजही त्यांचा आदर्श स्त्रियांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना स्फूर्तिदायक आहे. म्हणून त्यांची १५० वी जयंति स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समिति, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, मुस्लीम सत्यशोधक समाज, युवक क्रांती दल, सावित्रीबाई फुले महिला मंडळ, श्रमिक महिला समिती, समाजवादी महिला सभा वगैरे संघटनांच्या वतीने साजरी करण्यात आली. म. फुल्यांनी सुरू केलेल्या फरासखाना, बुधवार पेठ येथील भिड्यांच्या वाड्यातील शाळेजवळून फेरी निघून सं. ५॥ च्या सुमारास गंजपेठेतील म. फुल्यांच्या वाड्यात पोहोचली. तेथे तिचे सभेत रुपांतर झाले. फेरीच्या पुढे म. फुले आणि सावित्रीबाई फुल्यांचे फोटो हार घालून एका ट्रकवर ठेवले होते. फेरीमध्ये सुमारे ४०० स्त्रीपुरुष सामील झाले होते. सावित्रीबाई फुले झिंदाबाद, म. फुले झिंदाबाद, स्त्रियांना शिक्षण मिळालेच पाहिजे, स्त्रियांना रोजगार मिळालाच पाहिजे, समान कामाला समान वेतन मिळालेच पाहिजे... वगैरे घोषणा देण्यात येत होत्या.

सभेचे अध्यक्षस्थान माई केदारी यांनी स्वीकारले होते. प्रास्ताविक सौदामिनी राव यांनी केले. प्रमुख पाहुणे बाबा आढाव होते. सभेमध्ये कष्टकरी स्त्रियांची आणि निरनिराळ्या संघटनांच्या प्रतिनिधींची भाषणे झाली. त्याचप्रमाणे स्त्रीमुक्तीची गाणी म्हटली गेली. सभेला सुमारे ६०० स्त्रीपुरुष हजर होते. त्यात हमाल व कष्टकरी स्त्रियांची संख्या मोठी होती.

बायजा प्रतिनिधी